| MHPU170014332023 | दाखल दिनांक | १८/०४/२०२३ | | |
|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | १८/०४/२०२३ | | |
| | निकाली दिनांक | २३/०७/२०२६ | | |
| | कालावधी | व. | म. | दि. |
| | | ०३ | ०३ | ०५ |

**<u>न्यायदंडाधिकारी वर्ग –१, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे यांचे न्यायालयात</u>**

**(<u>पिठासीन अधिकारी श्री.अतुल भि. पाटील</u> )**

(दि.२३ जुलै, २०२६ रोजी पारीत)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५७५/२०२३** **(निशाणी क्र.२६)**

(वालचंदनगर पोलीस स्टेशन गु. र. नं.४०८/२०२२ प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ चे कलम ५(अ),(ब) व ९ प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११(१)(ए),(एफ),(एच) व मोटार वाहन कायदा कलम ८३/१७७ अन्वये )

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | – | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस निरीक्षक, वालचंदनगर पोलीस ठाणे,<br>ता.इंदापूर, जि.पुणे. |
| अभियोगपक्षातर्फे | – | श्री.एस.एस.भांडारकर, सहा. सरकारी अभियोक्ता. |
| तक्रारदार | – | **किसन सुरेश बेलदार ,**<br>वय–४३ वर्ष, नेमणूक – पो.शि./११९६,<br>रा.वालचंदनगर, ता.इंदापूर, जि.पुणे. |
| आरोपी | – | **इम्रान निजाम कुरेशी ,**<br>वय –२९ वर्ष, धंदा – मजुरी,<br>रा.लासुर्णे (राजवाडा)<br>ता.इंदापूर, जि.पुणे. |
| आरोपीतर्फे | – | श्री.एम.पी.लोंढे, विधीज्ञ. |
| गुन्हा घडल्याची तारीख | – | दि.११/०९/२०२२ |
| प्रथम खबरची तारीख | – | दि.११/०९/२०२२ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र दाखल तारीख | – | दि.१८/०४/२०२३ |
| दोषारोपाचा तपशील ठेवल्याची तारीख | – | दि.१६/११/२०२४ |
| पुरावा आरंभ केल्याची तारीख | – | दि.१३/०८/२०२५ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | – | दि.१०/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय घोषित केल्याची तारीख | – | दि.२३/०७/२०२६ |
| शिक्षा असल्यास, आदेशाचा दिनांक | – | नाही. |

## (आरोपीचा तपशिल)

| अ.क्र. | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | शिक्षा दिली किंवा निर्दोष सोडले | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता संपरिक्षेदरम्यान तुरुंगात असल्यास तो कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **इम्रान निजाम कुरेशी** | दि.१३/०९/२०२२ | दि.१३/०९/२०२२ | प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ चे कलम ५(अ), (ब) व ९ प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११(१)(ए),(एफ),(एच) भा.द.वि. कलम ३४ व मो.वा. कायदा कलम ८३/१७७ अन्वये | निर्दोष सोडले | नाही. | नाही. |

## (अभियोग पक्षाचे साक्षीदारांची यादी)

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | साक्षीदाराची भुमीका |
|---|---|---|
| **सा.क्र.१** | वैभव रमेश साबळे | पंच |
| **सा.क्र.२** | किसन सुरेश बेलदार | फिर्यादी |
| **सा.क्र.३** | नागेश हिरामन बोरगे | साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| **सा.क्र.४** | उत्तम धर्मा खाडे | तपासी अंमलदार |

**( अभियोगपक्षाचे निशाणी )**

| **अ.क्र.** | **निशाणी नं.** | **तपशील** |
|---|---|---|
| १. | १७ | **फिर्याद** |
| २. | २० | **जप्ती पंचनामा** |
| ३. | २१ | **मुद्देमाल पावती** |
| ४. | २२ | **गोशाळा पत्र** |
| ५. | २३ | **घटनास्थळ पंचनामा** |
| ६. | २४ | **ताबा पावती** |

**( अभियोगपक्षाचे वस्तु )**

| **अ.क्र.** | **वस्तु नं.** | **तपशील** |
|---|---|---|
| १. | – | – |

## न्या य नि र्ण य

( दि.२३ जुलै, २०२६ रोजी पारीत )

आरोपीविरुध्द प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ चे कलम ५(अ),(ब) व ९ प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११(१)(ए),(एफ),(एच) व मोटार वाहन कायदा कलम ८३/१७७ अन्वये दोषारोप ठेवुन खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाच्या खटल्याची हकिकत थोडक्यात पुढीलप्रमाणे –**

२. फिर्यादी किसन सुरेश बेलदार यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली की, दि.११/०९/२०२२ रोजी पहाटे ०३.०० वाजताच्या सुमारास फिर्यादी व पो.स.ई.टेळकीकर

तसेच होमगार्ड एस.जी.चितारे, एन.एच.बोरगे असे पोलीस स्टेशन हद्दीत रात्रगस्त डयुटी करीत असताना पो.स.ई.टेळकीकर यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मौजे लासुर्णे गावचे हद्दीत राजवाडा येथे इसम नामे इम्रान निजाम कुरेशी हा त्याचेकडील वाहनात दोन गाई तसेच त्याचे घरासमोरील आवारात १४ गाईंची लहान वासरे भरून ते कत्तलीसाठी लासुर्णे येथे घेवून आला. त्यामुळे ते लागलीच सरकारी वाहनाने लासुर्णे राजवाडा येथे इम्रान निजाम कुरेशी याचे घराचे समोर जावून पाहणी केली असता त्याचेकडील वाहन महिंद्रा छोटा हत्ती वाहन क्र.एम.एच.४२.ए.क्यू.५४४९ यामध्ये दोन गाई तसेच त्याचे घरासमोरील आवारात १४ गाईंची लहान वासरे मिळून आली. इसम नामे इम्रान कुरेशी याचेकडे चौकशी केली असता त्याने त्याचेकडील वाहनात व घरासमोरील आवारात एकूण दोन गाई व १४ गाईंची लहान वासरे असल्याचे सांगितले. सदर वाहनातील व घराचे समोरील आवारातील जनावरे कोठून आणली आहेत व येथे कशाला घेवून आला आहे असे विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर सदर वाहनाची पाहणी केली असता वाहनातील तसेच आवारातील एकूण १६ जनावरे मिळून आली. ती जखमी अवस्थेत होती व भुकेने व्याकुळ होवून अशक्त झालेली दिसत होती. सदर वाहनामध्ये जनावरांच्या चारापाण्याची व औषधोपचाराची कसलीही सोय नव्हती. त्यावेळी त्यास तुझ्याकडे जनावरे खरेदी विक्रीच्या पावत्या व जनावरे वाहतुकीचा परवाना आहे का याबाबत विचारले असता त्याने कोणत्याही पावत्या व परवाना नसल्याचे सांगितले. त्यानंतर सदरचे वाहन जनावरांसह पोलीस स्टेशनला घेवून आले. त्यामुळे आरोपीविरुध्द पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादीवरुन गु.र.नं.४०८/२०२२ चा नोंदविण्यात आला. गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार/२३४, श्री. यु. डी. खाडे यांच्याकडे देण्यात आला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा केला, जप्त मुद्देमालाची पावती फाडली, गो शाळा येथे जनावरे जमा करून घेणेबाबत पत्रव्यवहार केला. आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा मिळून आल्याने त्यांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र पाठविले.

४. आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर नि.१२ वर आरोपीविरुध्द दोषारोप ठेवला. तो आरोपीस वाचून व समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा नाकबूल केल्याने खटल्याची पुढील संपरिक्षा करण्यात आली.

५. आरोपीविरुध्द परिस्थितीविशेष खुलासा करणेइतपत पुरावा अभिलेखावर आल्याने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१(१)(ब) अन्वयेचे निवेदन नि.क्र.२५ वर नोंदविण्यात आले. आरोपीने खोटी केस केली असल्याचा बचाव घेतला.

६. आरोपीविरुध्दचा दोषारोप, अभियोगपक्षाच्या साक्षीदाराचा पुरावा इत्यादीचा विचार करीता खालील मुद्दे खटल्याच्या विचारार्थ उपस्थित झाले. त्याचे निष्कर्ष कारणमिमासेसहित खालीलप्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| *अ.क्र.* | *मुद्दे* | *निष्कर्ष* |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, दि.११/०९/२०२२ रोजी पहाटे ०३.०० वाजण्याच्या सुमारास मौजे लासुर्णे हद्दीत राजवाडा येथे आरोपीचे घरासमोरील आवारात, लासुर्णे, ता.इंदापूर, जि.पुणे येथे आरोपी जर्शी जातीची २ कालवडी व घरासमोरील आवारात जर्शी जातीची १४ लहान वासरे अंथुले अशी १६ जनावरे आरोपीने त्याच्या ताब्यातील महेंद्रा कंपनीचा छोटा हत्ती क्र.एम.एच.४२.ए.क्यू.५४४९ मध्ये कोंबून कत्तलीसाठी अनाधिकृतपणे वाहतुक केली ? | *नाही.* |
| २. | अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी त्याच्या ताब्यातील महेंद्रा कंपनीचा छोटा हत्ती क्र.एम.एच.४२.ए.क्यू.५४४९ मध्ये जर्शी जातीची २ कालवडी व घरासमोरील आवारात जर्सी जातीची १४ लहान वासरे अंथुले अशी १६ जनावरे भुकेने व्याकुळ होवून अशक्त झालेली त्यांना निर्दयीपणे वागणूक देऊन, त्यांना चारापाण्याची व औषधोपचाराची सोय न करता आरोपीने त्यांची वाहतुक केली ? | *नाही.* |
| ३. | अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील महेंद्रा कंपनीचा छोटा हत्ती क्र.एम.एच.४२.ए.क्यू.५४४९ मधून वरील नमूद जनावरांचे बेकायदेशीररित्या विनापरवाना वाहतूक केली ? | *नाही.* |

| | | |
|---|---|---|
| ४. | आदेश काय ? | ***<u>आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.</u>*** |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दा क्र. १ ते ४ करिता</u>

७. आरोपीविरुध्द प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ चे कलम ५(अ),(ब) व ९ प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११(१)(ए),(एफ),(एच) भा.द.वि. कलम ३४ व मोटार वाहन कायदा कलम ८३/१७७ अन्वये गुन्हयाचा दोषारोप नोंदविलेला आहे. त्यामुळे अभियोगपक्षाने आरोपीने दोन जर्शी जातीची कालवडी व १४ लहान वासरे अंथुले अशी १६ जनावरे त्याच्या महेंद्रा कंपनीचा छोटा हत्ती क्र.एम.एच.४२.ए.क्यू.५४४९ मध्ये दाटीवाटीने कोंबून, चारापाण्याची व औषधोपचाराची सोय न करता वाहतुकीचा परवाना नसताना व खरेदी विक्रीच्या पावत्या नसताना वाहतूक केली या बाबी संशयापलीकडे जावून सिध्द केल्या का ? हे पाहणे आवश्यक आहे.

८. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी सा.क्र.२ किसन सुरेश बेलदार यांची साक्ष नि.क्र.१६ वर नोंदविली. सदर साक्षीदाराने त्याच्या सरतपासात दि.११/०९/२०२२ रोजी ते वालचंदनगर पोलीस स्टेशन येथे वाहन चालक या पदावर कार्यरत असताना ते रात्री गस्तीला कर्तव्यावर होते. त्याच्यासोबत पी.एस.आय.टेळकीकर, दोन होमगार्ड होते. ११ तारखेला पहाटे ३ वाजता गस्ती घालत असताना पी.एस.आय.टेळकीकर यांना फोन आला की, दोन गायी व १४ वासरे ही लासुर्णे येथील राजवाडयाशेजारी आणून ठेवली आहेत. त्यानंतर ते लगेच लासुर्णेला निघाले. तेथे जावून पाहिले असता तेथे एका टेम्पोमध्ये दोन गायी होत्या व घरासमोर चौदा वासरे होती. तेथे विचारपूस केली असता गायी व वासरे इम्रान कुरेशी यांची असल्याचे समजले. त्यांनी आरोपीला उठवून त्याची विचारपूस केली. परंतू त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. जनावरांना

कोणतेही खायला दिलेले नव्हते. त्यानंतर पोलीस स्टेशनला जावून फिर्याद नि.क्र.१७ दिली. त्यानंतर त्यांनी तपासी अंमलदार खाडे यांना घटनास्थळ दाखविले. सदर साक्षीदाराच्या साक्षीतून फिर्याद नि.क्र.१७ सिध्द केलेले आहे.

९. आरोपीतर्फे सदर साक्षीदाराचा सविस्तर उलटतपास घेण्यात आला. उलटतपासात सदर साक्षीदाराने आरोपीच्या घराशेजारी अनेक जनावरांचे गोठे आहेत. जनावरांची डॉक्टरांकडून वैद्यकीय तपासणी करून घेतली नाही. आनंदनगर भागातून बरेच शेतकरी त्यांची गुरे शेती महामंडळाच्या जागेत चरायला आणतात या बाबी स्पष्टपणे कबूल केलेल्या आहेत. येथे नमूद करणे आवश्यक वाटते की, सदर साक्षीदाराने त्याच्या जबाबात कोठेही जनावरे ही आरोपीची होती असे कथन केलेले नाही. सदर साक्षीदाराची साक्ष ही ऐकीव स्वरूपाची वाटते. त्यामुळे सदर साक्षीदाराच्या साक्षीला फारसे महत्व प्राप्त होत नाही.

१०. अभियोगपक्षाने जप्ती पंचनामा सिध्द करण्यासाठी साक्षीदार क्र.१ पंच वैभव रमेश साबळे याची साक्ष नि.क्र.१४ वर नोंदविली. सदर साक्षीदाराने त्याच्या सरतपासात दि.११/०९/२०२२ रोजी त्याचेसमक्ष कोणताही पंचनामा झाला नसल्याचे कथन केले. पोलीसांनी त्याची एका कागदावर सही घेतल्याचे कथन केलेले आहे. अभियोगपक्षाने सदर साक्षीदारांना उत्तरसुचक प्रश्न विचारून उलटतपास घेतला. परंतू उलटतपासात अभियोगपक्षाच्या कथनाला दुजोरा मिळेल अशी कोणतीही कबूली सदर साक्षीदाराने दिलेली नाही. परिणामी जप्ती पंचनामा पंच साक्षीदाराच्या साक्षीतून सिध्द झालेला नाही.

११. साक्षीदार क्र.३ नागेश हिरामन बोरगे यांची साक्ष नि.क्र.१८ वर नोंदविली. सदर साक्षीदाराने त्याच्या सरतपासात दि.१०/०९/२०२२ रोजी ते वालचंदनगर पोलीस स्टेशन येथे होमगार्ड होते. पो.उप.नि.टेळकीकर यांचेसोबत बंदोबस्त लागला होता. टेळकीकर यांना बातमी मिळाली की, लासुर्णे गावात राजवाडयाशेजारी दोन गायी व चौदा वासरांची पिल्ले आहेत. त्यानंतर ते पोलीस स्टेशनमधून निघाले. घटनास्थळावर गेले व चौकशी केली त्यावेळी त्यांना इमरान कुरेशी यांचे असल्याचे समजले. रात्री ०३.०० वाजता आरोपीला उठवले. एम.एच.४२.ए.क्यू.५४४९ या वाहनात दोन गाई होत्या व शेजारच्या आवारात चौदा पिल्ले होती. आरोपीने जनावराबाबत समाधानकारक उत्तर दिले नाही. म्हणून त्यांना पोलीस स्टेशनला

घेवून गेले. म्हणून आरोपीविरुध्द बेलदार यांनी फिर्याद दिली. पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदविला.

**१२.** आरोपीतर्फे सदर साक्षीदाराचा सविस्तर उलटतपास घेण्यात आला. उलटतपासात सदर साक्षीदाराने मान्य केले की, घटनेच्या ठिकाणी अंधार होता. पोलीसांनीच त्याला गाडी आरोपीची असल्याचे सांगितले. घटनास्थळावर कम्पाऊंड केलेने दिसत नाही. जनावरे कोणत्या अवस्थेत आहेत हे त्याने पाहिले नाही. कोणी आरोपीचे नाव सांगितले हे त्याला माहीत नाही. वाहन कोणाचे आहे याची चौकशी केली नाही. येथे नमूद करणे आवश्यक वाटते की, प्रस्तुत प्रकरणातील जनावरे आरोपीची होती असे सदर साक्षीदाराने त्याच्या सरतपासात स्पष्टपणे कथन केलेले नाही. तसेच जप्त गाडी ही आरोपीची होती याबाबतही सदर साक्षीदाराने कथन केलेले नाही. सदर साक्षीदाराला पोलीसांनीच आरोपीचे नाव सांगितले त्यामुळे सदर साक्षीदाराला आरोपीच्या गुन्हयातील सहभागाविषयी प्रत्यक्ष माहिती नाही असे दिसून येते. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही.

**१३.** साक्षीदार क्र.४ उत्तम धर्मा खाडे हे प्रस्तुत प्रकरणातील तपासी अंमलदार आहेत. त्यांची साक्ष नि.क्र.१९ वर नोंदविली. सदर साक्षीदाराने त्यांच्या सरतपासात दि.११/०९/२०२२ रोजी ते वालचंदनगर पोलीस स्टेशन येथे पो.हवा. या पदावर कार्यरत असताना पो.हवा.बेलदार यांनी खबर दिली की, इम्रान कुरेशी रा.लासुर्णे याने त्याच्या घरासमोर गायीची वासरे व गायी बांधलेल्या आहेत. त्यांनी घटनास्थळावर जावून पाहणी केली तेव्हा दोन गायी टेम्पोमध्ये होत्या व चौदा वासरे बांधलेली दिसली. त्यानंतर ते जनावरे घेवून पोलीस स्टेशनला आले व फिर्याद दिली. ठाणे अंमलदार यांनी गुन्हा नोंद करून तपास त्यांचेकडे दिला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२३ केला. छोटा हत्ती जप्त केला. त्याचा जप्ती पंचनामा नि.क्र.२० केला. वाहनाची पावती नि.क्र.२१ फाडून जमा केला. वासरे गोशाळेत पत्र नि.क्र.२२ ने जमा केली. जनावरे ताबा पावतीस नि.क्र.२४ ने दिली. साक्षीदारांचे तपास टिपणे नोंदविली. आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले. आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्याने आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले असे कथन केले आहे.

**१४.** आरोपीतर्फे सदर साक्षीदाराचा सविस्तर उलटतपास घेण्यात आला. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात घटनास्थळ कोणाच्या नावाने आहे याची माहिती घेतली नाही. त्याचा उतारा हस्तगत केला नाही. घटनास्थळाचा नकाशा काढला नाही. जनावरांची तपासणी वैद्यकीय अधिका–यामार्फत केली नाही या गोष्टी स्पष्टपणे कबूल केलेल्या आहेत.

**१५.** येथे नमूद करणे आवश्यक वाटते की, अभियोगपक्षाने केवळ हितदर्शी साक्षीदारांची साक्ष याकामी नोंदविलेली आहे. प्रस्तुत प्रकरणातील जप्त वाहन हे आरोपीचे होते असे दाखविणारा कोणताही पुरावा अभियोग पक्षाने दोषारोपपत्रासोबत दाखल केलेला नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणातील जनावरे ही आरोपीने वाहतूक केली व ती आरोपीने कत्तलीसाठी आणली होती असे दाखविणाराही कोणताही सरळ पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे आरोपीला प्रस्तुत गुन्हयात गोवणारा विश्वसनीय पुरावा अभिलेखावर उपलब्ध असल्याचे दिसून येत नाही.

**१६.** प्रस्तुत प्रकरणातील जप्ती पंचनामा सिध्द करण्यासाठी तपासलेले पंच साक्षीदार यांनी अभियोगपक्षास साहाय्य केलेले नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा स्वतंत्र साक्षीदाराकडून सिध्द झालेला नाही. आरोपीने परवाना नसताना वाहतूक केली असे दाखविणारा पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. तसेच आरोपीने जनावरांची चारा पाण्याची व औषधोपचाराची सोय न करता कत्तलीसाठी जनावरे घेवून आला हे दाखविणारा सबळ पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. प्रस्थापित कायदयाच्या तत्वानुसार अभियोगपक्षाने आरोपीवरील गुन्हा संशयाच्या पलीकडे जावून सिध्द केला पाहिजे. परंतू प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द सबळ व विश्वसनीय पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे आरोपी हे संशयाचा फायदा देवून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतात व मुद्दा क्र.४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. **आरोपी इम्रान निजाम कुरेशी** यांची प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ चे कलम ५(अ), (ब) व ९ प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११(१)(ए),(एफ), (एच) व मोटार वाहन कायदा कलम ८३/१७७ अन्वयेच्या शिक्षेस पात्र अपराधातून

भारतीय नागरीक सुरक्षा संहिता क.२७१(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

**३.** एक महिंद्रा कंपनीचा जितो छोटा हत्ती टेम्पो क्र.एम.एच.४२–ए.क्यू.–५४४९ हा अजूनही जप्त असेल तर अपील कालावधीनंतर त्याचे नोंदणीकृत मालकास परत करण्यात यावा.

**४.** भारतीय नागरीक सुरक्षा संहिता क.४८१(१) अन्वये आरोपीने रुपये १५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र द्यावे असे आदेशीत करण्यात येते. सहा महिन्याच्या कालावधीत अपील न झालेस, सदर वैयक्तीक बंधपत्र रद्द झाले असे समजण्यात येईल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by PATIL ATUL BHIMRAO
Date: 2026.07.23 17:24:33 +0530

**दिनांक –२३/०७/२०२६**

**(ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | उमेश वाय.भगत |
| न्यायालयाचे नाव | श्री. ए. बी. पाटील, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, इंदापूर. |
| न्यायनिर्णयाची तारिख | २३/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | २३/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | २३/०७/२०२६ |